स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक **12–07–2013** रोजी दुपारी **03–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.अविनाश निळकंठ ठाकरे | **सभापती** |
| 2. | श्री. पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 3. | डॉ. प्रशांत रसपाल चोपडा | सदस्य |
| 4. | श्री.राजेश श्रावण घोडपागे | सदस्य |
| 5. | सौ.रीता अशोक मुळे | सदस्या |
| 6. | सौ. वंदना विनोद इंगोले | सदस्या |
| 7. | सौ. विषया विकास खोब्रागडे | सदस्या |
| 8. | श्री.किशोर चिधुंजी गजभिये | सदस्य |
| 9. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 10. | सौ. भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 11. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |
| 12. | श्री. देवेंन्द्र महादेव मेहर | सदस्या |
| 13. | श्री. अमान उल्लाह खान व. अब्दुल मजीद खान | सदस्य |
| 14. | सौ. सिमा सुनिल राऊत | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती मिना दिलीप चौधरी | सदस्या |
| 2. | सौ. मायाताई चितांमण इवनाते | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. हेमंतकुमार पवार, अपर आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 86</u> :– म.न.पा.च्या विविध विभागांना संगणक ऑपरेटर्स चा पुरवठा करणेबाबत.

अ) या कामकरिता निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये वाटाघाटी नंतर रु.11271/– प्रति माह. प्रति ऑपरेटर याप्रमाणे दर प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे आदेश प्राप्त झाले. त्यानुसार सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यास मा. आयुक्तांची मंजुरी प्राप्त झालेली आहे.

ब) सुधारित प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

महाराष्ट्र शासन जी.आर. क्र.रोहयो 2011/प्र.क्र.23/रोहयो–9, दि. 08 डिसेंबर 2011 नुसार संगणक ऑपरेटर्स यांचे दर रु. 6000/– प्रति माह आहेत व शासन नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. कंत्राटी –2013/प्र.क्र.2/मग्रारो 3, दि. 01 जुन 2013 नुसार मानधनात रु. 1000/– ची वाढ करण्यात आलेली आहे. त्यानुसार नियुक्त करावयाच्या संगणक ऑपरेटरला प्रति माह रु. 7000/– एवढे मानधन अदा करावे लागेल.

नागपूर महानगरपालिकेस साधारणपणे 100 संगणक ऑपरेटर्स ची आवश्यकता आहे. वरील मानधन विचारात घेता रु. 7000/– X 12 महिने X 100 संगणक ऑपरेटर्स = रुपये 84,00,000/– एवढा वार्षिक खर्च अपेक्षीत आहे.

जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या सेतु समिती मार्फत वरील 100 संगणक ऑपरेटर्स नियुक्त करण्याचा प्रस्ताव आहे.

करिता नागपूर महानगरपालिकेच्या विविध कार्यालयांकरिता प्रति संगणक ऑपरेटर प्रति माह रु.7000/– या प्रमाणे 1 वर्षाकरिता जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या कडून एकूण 100 संगणक ऑपरेटर्स घेण्याच्या प्रस्तावास व यासाठी येणाऱ्या रु. 84 लक्षाच्या खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन स्थायी समिती ठराव क्र. 100 दिनांक 07.08. 2012 च्या ठरावास दिलेली मंजूरी कायम ठेवण्यास स्थायी समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली. तसेच ठराव क्र. 197 दिनांक 26.11.2012 मधील सुचना सुध्दा कायम करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

तसेच महाराष्ट्र शासन निर्णय क्र. रोहयो–2011/प्र.क्र. 23/रोहयो–9 दिनांक 08.10. 2011 यास म.न.पा. महासभेची मंजूरी प्रशासनाने मंजूरी घेतली नसल्यामुळे व कार्यालय याची स्पष्टता स्थायी समितीस करुन न शकल्यामुळे प्रस्तावित केलेला "ब" सुधारित प्रस्तावास समितीने एकमताने नामंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 87</u> :– नागपूर शहरात निर्मित होणाऱ्या सांडपाण्यावर लोकसहभागाद्वारे भांडेवाडी येथील मलनि:सारण केन्द्राचे पुर्नवसन करुन २०० द.ल.लि. पर्यंत क्षमता वाढविणे.

प्रस्तावना :

नागपूर शहराचे एकूण क्षेत्रफळ २१७.५६ चौ.कि.मी. असून सध्याची लोकसंख्या अंदाजे २५.०० लक्ष आहे. मलनि:सारण योजना नागपूर शहराच्या प्राकृतिक पातळीवर (Topogaphy नुसार) तीन प्रमुख भागात विभाजित करण्यात आलेली आहे.

- नॉर्थ झोन : उत्तर–पश्चिम व पूर्व नागपूरचा भाग
- सेन्ट्रल झोन : नागपूरचा मध्य मिळून भाग
- साऊथ झोन : पश्चिम दक्षिण भाग

सांडपाणी निर्मिती व शुध्दीकरण :

**CPHEEO** च्या मापदंडानूसार **(Design Criteria for Water Supply)** प्रमाणे उत्तर, मध्य व दक्षिण सिवरेज झोन अंतर्गत भविष्यातील लोकसंख्येमध्ये होणारी वाढ गृहीत धरुन खालील तक्त्याप्रमाणे झोननिहाय सांडपाण्याची निर्मिती होत आहे व भविष्यात होईल.

| **Projected Year** | **North Sewerage Zone** | **Central Sewerage Zone** | **South Sewerage Zone** | **Total Sewage Generation in Nagpur City (MLD)** |
|---|---|---|---|---|
| | **Sewage (MLD)** | **Sewage (MLD)** | **Sewage (MLD)** | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| **2011** | 117.44 | 142.55 | 85.40 | 345.39 |
| **2026** | 185.39 | 189.50 | 135.63 | 510.52 |

मध्य नागपूर हा दाट लोकवस्ती असलेला भाग असून त्याकरिता भुयारी गटार योजना अस्तित्वात आहे. या भागातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याच्या शुध्दीकरणाकरिता भांडेवाडी येथे मलशुध्दीकरण केन्द्र बांधण्यात आले असून तेथे ७०–८० द.ल.लि. प्रतिदिन सांडपाण्याचे शुध्दीकरण होते.

वाढीव लोकसंख्ये प्रमाणे नागपूर शहरात दररोज अंदाजे ३५० ते ४०० Mld Waste Water (सांडपाणी) निर्मिती (Generate) होते. पावसाळया (Monsoon Season) मध्ये सांडपाण्याची वाढ होत असते. सद्यस्थितीत अंदाजे २७५ ते ३२५ एम.एल.डी सांडपाणी पिवळीनदी व नागनदीत सोडावे लागते.

उपरोक्त तीनही झोन मधील अंदाजे ७० % टक्के भाग हा सिवरेज नेटवर्क द्वारे व्यापलेला आहे. नागपूर शहरातील सिवर लाईनची लांबी अंदाजे १६७० कि.मी. इतकी असून व्यास १५० मी.मी. ते १८०० मी.मी. इतका आहे.

<u>झोननिहाय प्रस्तावित मलनि:सारण केन्द्र :</u>

| | उत्तर | मध्य | दक्षिण |
|---|---|---|---|
| २०११ ते २०२६ | २ | १ * | १ |

* १३० द.ल.लि. क्षमतेच्या मलनि:सारण केंद्राचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

वित्तीय स्वरुप :

उपरोक्त सर्व प्रकल्प केन्द्र शासनाचे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनर्रुत्थान अभियानांतर्गत शासकीय निधी मिळण्यास्त सादर करण्याचा मनपाचा मानस आहे. या प्रकल्पाकरीता लाणणाऱ्या खर्चाचा तपशील पुढील प्रमाणे राहील.

| Particulars | North Sewerage Zone | Central Sewerage Zone | South Sewerage Zone | Total |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| Sewage Generated in 2011 | 117.44 Mld | 142.55 Mld | 85.40 Mld | 345.39 Mld |
| Sewage Generated in 2026 | 185.39 Mld | 189.50 Mld | 135.63 Mld | 510.52 Mld |
| Estimated cost of STP | Rs. 188.78 Crs. | 0 | Rs. 78.66 Crs. | Rs. 267.44 Crs. |
| Estimated cost of Sewerage | Rs. 425.47 Crs. | Rs. 370.30 Crs. | Rs. 265.67 Crs. | Rs. 1061.44 Crs. |
| **Estimated cost of STP & Sewerage System** | **Rs. 614.25 Crs.** | **Rs. 370.30 Crs.** | **Rs. 344.33 Crs.** | **Rs. 1328.88 Crs.** |
| GOI (50%) | Rs.307.13 Crs. | Rs. 185.16 Crs. | Rs. 172.17 Crs. | Rs. 664.46 Crs. |
| GOM (20%) | Rs. 122.85 Crs. | Rs. 74.06 Crs. | Rs. 68.87 Crs. | Rs. 265.78 Crs. |
| NMC | Rs. 155.36 Crs. | Rs. 93.64 Crs. | Rs. 80.20 Crs. | Rs. 329.20 Crs. |
| NIT | Rs. 28.92 Crs. | Rs. 17.48 Crs. | Rs. 23.10 Crs. | Rs. 69.50 Crs. |

हा निधी प्राप्त झाल्याशिवाय स्वबळावर मनपास अशी कामे हाती घेणे अत्यंत कठीण आहे.

**लोकसहभाग व खाजगी भागीदारीतून मलनि:सारण केन्द्राचे बांधकाम करणे (PPP) :**

सध्या नागपूर शहरात ३५० ते ४०० Mld सांडपाण्याची निर्मिती होते यातील फक्त ७० Mld सांडपाण्यावर भांडेवाडी येथे प्रक्रिया करुन नाग नदीत सोडण्यात येते. मनपा व महाजेनको सोबत झालेल्या करारानुसार पुढील २ वर्षात १३० Mld सांडपाण्यावर प्रक्रिया पूर्ण होईल.

धार्मिक फांउडेशन द्वारा मा. उच्च न्यायालयात दाखिल जनयाचिकेच्या (PIL No 38/2010) निर्णयानूसार मनपाला Sewage treatment चा time bound schedule शपथपत्राद्वारे सादर करण्यास सांगण्यात आले. त्यानुसार मनपाने महाजेकोद्वारा सादर time schedule व PPP तत्वावर उर्वरीत सांडपाण्यावर आधारीत Sewage Treatment Plant करीता दिलेला time schedule शपथपत्राद्वारे मा. उच्च न्यायालयात सादर करण्यात आलेला आहे. याद्वारे मनपाला नाग नदीतील सांडपाण्याचे प्रदुषण कमी होण्यास मदत होईल. याकरीता सद्यस्थितीत भांडेवाडी येथील STP upgradation करुन त्याला २०० Mld क्षमतेपर्यंत करावयाची आहे. उपरोक्त कामास भरपूर निधीची आवश्यकता भासेल. करीता मनपाद्वारे PPP तत्वावर उपरोक्त मलनि:सारण केन्द्र बांधण्याचा मानस आहे.

PPP तत्वावर प्रकल्प राबविण्याकरीता खालीलप्रमाणे Annuity basis आर्थिक बिंदु गृहीत धरण्यात आलेले आहे.

1. The Operator shall treat the sewage to the secondary level so as to fulfill the surface water standards laid down by MPCB. (30/100), BOD-30 mg/L @$27^0$ for three days & suspended solid 100 mg/l through proven technology.
2. Out of total capital cost, 70% will be in the form of loan (RI=13%).
3. Remaining 30% of the cost shall be invested by the bidder. (RR=18%)
4. O&M of the secondary treatment plant shall be looked after for 30 years by the operator.
5. Out of secondary treated waste water 25 Mld shall be given to NMC without any cost.
6. Remaining 175 Mld treated waste water the operator will have right to sale to the potential users.
7. Annuity ranging from Rs. 30.00 Crs to Rs. 40.00 Crs.
8. Out of this, NMC should be in a position to earn Rs. 30.00 Crs. to 40.00 Crs. Per annum as royalty after the sale of treated waste water.
9. Ownership of land & the plant shall be of NMC.

महानगरपालिकेद्वारा प्रस्तावित PPP तत्वावर ची ढोबळ किंमत अंदाजे रु. १७०.५ कोटी इतकी आहे. आर्थिक बिंदु लक्षात घेता या प्रकल्पाची Net Present Value (NPV) रु. २९७.६० कोटी राहील.

प्रकल्पाची राशी फार जास्त असल्यामुळे महानगरपालिकेला स्वत:चे बजेट मधून इतकी मोठी राशी या प्रकल्पाकरीता वळती करणे शक्य नसल्यामुळे PPP तत्वावर STP बांधण्याकरीता महानगरपालिकेने Expression of Interest मागविले असता १९ कंपन्यांनी इच्छा दर्शविली. उत्तर व दक्षिण सिवरेज झोन चे सांडपाणी भांडेवाडी येथे आणून मलनि:सारण प्रक्रिया केन्द्र बांधण्याकरीता १९ कंपन्यांना RFP document देण्यात आले

१९ कंपन्यांपैकी RFP documents खालील ६ कंपन्यांनी सादर केली आहेत.

1. M/s. ESSAR-THEMAX-SREI, (JV), Mumbai
2. M/s. GHARPURE Engineers & Constructions Pvt. Ltd. – United Phosphorous Ltd., (JV) – Pune
3. M/s RAMKY Infrastructure, Hyderabad, India
4. M/s. SEW –AIPPL (JV), Hyderabad
5. M/s. Triveni, Engineering Industries Ltd.- Oriental Structural Engineers Pvt. Ltd. (JV), NOIDA, U.P.
6. M/s. Vishwaraj Infrastructure Ltd Nagpur – Drake & Scull Water & Power LLC – Vasundhara drills & drainage Pvt. Ltd. (JV), Nagpur

या सहाही कंपन्यांनी सादर केलेला आर्थिक निविदेचा तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

| **Sr. No.** | **Name of the Bidders** | **Price quoted** | **Remarks** |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | M/s. ESSAR-THEMAX-SREI, (JV), Mumbai | 38954.11 lacs | 3rd Lowest |
| 2 | M/s. GHARPURE Engineers & Constructions Pvt. Ltd. – United Phosphorous Ltd., (JV) – Pune | 51174.00 Lacs | 5th Lowest |
| 3 | M/s RAMKY Infrastructure, Hyderabad, India | 31958.33 Lacs | 2nd Lowest |
| 4 | M/s. SEW –AIPPL (JV), Hyderabad | 61890.58 Lacs | 6th Lowest |
| 5 | M/s. Triveni, Engineering Industries Ltd.- Oriental Structural Engineers Pvt. Ltd. (JV), NOIDA, U.P. | 48916.00 Lacs | 4th Lowest |
| 6 | M/s. Vishwaraj Infrastructure Ltd Nagpur – Drake & Scull Water & Power LLC – Vasundhara drills & drainage Pvt. Ltd. (JV), Nagpur | 26171.59 Lacs | **1st Lowest** |

उपरोक्त निविदांची शहानिशा Maharashtra Urban Infrastructure Development Co. Ltd. (MUINFRA), State PPP expert यांचे मार्फत करण्यात आलेली आहे. या सर्वानी सादर केलेले तांत्रिक व आर्थिक निविदेची पडताळणी केल्यावर M/s. Vishwaraj Infrastructure Ltd Nagpur – Drake & Scull Water & Power LLC – Vasundhara drills & drainage Pvt. Ltd. Nagpur (Joint Venture) यांची सर्वात निम्नतम राशीची निविदा रु २६१७१.५९ लक्ष इतकी आहे.

मनपाने हे काम जर M/s. Vishwaraj Infrastructure Ltd Nagpur – Drake & Scull Water & Power LLC यांच्या दरावर (रु. २६१.७१ कोटी) दिल्यास Cost-benefit comparative statement प्रमाणे मनपाला रॉयल्टी मधून अॅनुवीटी वगळल्यास ३२ वर्षानंतर एकूण रु. १११०६०.००—९४७६९.०० = १६२९१.००लक्ष (रु. १६२.९१ कोटी) निव्वळ फायदा होईल.

EOI मुळे मनपास पुढीलप्रमाणे फायदा अपेक्षित आहे.

**A.** PPP ऑपरेटरला जर हे काम दिले तर यामुळे वैनगंगा नदीवर असलेले गोसीखुर्द धरणाचे (राष्ट्रीय प्रकल्प) पाणी प्रदुषण विरहीत करण्यास मदत मिळेल. तसेच धार्मिक फाउंडेशन द्वारे दाखल जनहीत याचिकेत PIL No. 38/2010 अंतर्गत मा. उच्च न्यायालय द्वारे दिलेल्या निर्देशांचे पालन करणे शक्य होईल. तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांचे सुध्दा पालन करणे शक्य होईल.

**B.** PPP ऑपरेटर यांनी सादर केलेल्या आर्थिक निविदेप्रमाणे वार्षिक राशी (Annuity basis) प्रमाणे देण्यात येईल व यामुळे मनपावर एकाच वेळेस आर्थिक बोझा पडणार नाही. मात्र पुर्नचक्रीकरण केलेल्या सांडपाण्याची विक्रि झाल्यास मनपाला हा प्रकल्प विनामुल्य होईल.

**C.** प्रक्रिया केलेले पाणी विकून मनपास अंदाजे रु. ३२.०० कोटी प्रति वर्ष रॉयल्टीच्या स्वरुपात प्राप्त होईल. महानगरपालिकेला ३२ वर्षात रु. १६२.९१ कोटी निव्वळ राशी प्राप्त होईल.

**D.** २५ Mld (treated) प्रक्रिया केलेले पाणी मनपास free of cost मिळेल.

सबब, पुढीलप्रमाणे मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेतला.

१. PPP तत्वावर प्रकल्प राबविण्याकरीता जे आर्थिक बिंदु गृहीत धरलेले आहेत त्यांचा स्विकार करणे.

२. M/s. Vishwaraj Infrastructure Ltd Nagpur – Drake & Scull Water & Power LLC – Vasundhara drills & drainage Pvt. Ltd. (Joint Venture), Nagpur यांनी मनपाने ठरविलेल्या आर्थिक बिंदुवर आधारित सादर केलेली NPV रु. २६१.७२ कोटी ची निन्मतम निविदेस व त्याचे प्रक्रियेस मंजूरी प्रदान करणे.

३. PPP प्राजेक्ट चे काम पूर्ण झाल्यावर मनपाने ३० वर्षा पर्यंत रकमेची परतफेड करणे.

४. मनपास उपरोक्त प्रमाणे (ABCD) लाभ होईल त्याचा स्विकार करणे.

५. सिवरेज एस्क्रो अकाउंटची निर्मिती करुन ॲन्युटीची परतफेड करणे. यामध्ये महाजेनकोद्वारे मनपास भविष्यात प्राप्त होणाऱ्या रु. १५.०० कोटी प्रति वर्ष याचा समावेश राहील.

सभापती :– आयुक्तांनी जे पत्र दिले आहे. त्याचे वाचन करावे.

निगम सचिव :– विषय क्र. ७१ या संदर्भात मा. आयुक्तांनी एक लेखी पत्र दिले आहे या पत्रामध्ये त्यांनी अशी विनंती केली आहे की उपरोक्त क्र. ७१ मध्ये काही तांत्रिक चुक असल्यामुळे हा प्रस्ताव स्थायी समितीने प्रशासनाला परत करावा.

श्री किशोर गजभिये :– मा. सभापती, या विषयाच्या संदर्भात शपथपत्र दाखल करण्यांत आले होते काय ?

श्री उराडे (कार्य.अभि.) :– मा. सभापती, होय. मा. उच्च न्यायालयाने तसे निर्देश दिलेले होते. शहरातील सांडपाणी संकलीत करुन त्याचे निस्सारण करणे ही म.न.पा. ची प्राथमिक जबाबदारी आहे. या संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल झालेल्या जनहित याचिका क्र. ३८/२०१० चे अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दि. २५/११/२०१०, दि. १२/०१/२०१२ तसेच दि. ११/०५/२०१२ अन्वये मलनिस्सा:रणाबाबत पाऊले उचलावित असे कडक आदेश दिलेले आहे व तसेच याबाबत शपथपत्र सादर करावे असेही सांगण्यात आले.

सभापती :— या संदर्भात मा. उच्च न्यायालयाने काय आदेश दिले होते.

श्री उराडे (कार्य.अभि.) :— मा. सभापती, संबंधित विषयाची पार्श्वभूमी आताच विषद केलेली आहे. मलनिस्सा:रण करणे ही म.न.पा. ची प्राथमिक जबाबदारी असल्याने शहरातील नद्या दुषित होऊ नये यादृष्टीने शहरात तयार होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात यावी असे मा. उच्च न्यायालयाने निर्देश दिलेले आहेत. या संदर्भात महानगरपालिकेने दि. ३०/११/२०१० मा. आयुक्तांद्वारे व दि. २१/०३/२०१२ कार्यकारी अभियंता ( पेंच प्रकल्प ) सादर केलेले आहे. या शपथपत्राप्रमाणे लोक सहभाग ( पी.पी.पी. ) या तत्वावर मलनिस्सा:रण केंद्र उभारण्यात येईल अशी ग्वाही देण्यात आलेली आहे व त्याप्रमाणे विषयाअंतर्गतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीपुढे ठेवण्यात आलेला आहे.

सभापती :— यासाठी टाईम बाऊंड प्रोग्राम होता काय ?

श्री उराडे (कार्य.अभि.) :— मा. सभापती, टाईम बाऊंड प्रोग्राम दिलेला नव्हता परंतू पी.पी.पी. मॉडेलवर पुढील कार्यवाही चालू राहील असे शपथपत्रात नमुद केले आहे.

सभापती :— निगम आयुक्तांनी पाठविलेल्या पत्रानुसार कायद्यामध्ये काय तरतूद दिलेली आहे त्याविषयी सांगण्यात यावे.

निगम सचिव :— ज्या अर्थी प्रस्ताव प्रशासनातर्फे सादर केला आहे व त्यात काही तांत्रीक त्रुटी राहिली असेल तर ते प्रस्ताव परत घेवू शकतात, सुधारित प्रस्ताव सादर करण्याची कालमर्यादा बाबत स्थायी समितीने निर्देश दयावा.

डॉ. चोपडा :— मा. सभापती, संबंधित अधिकारी को जानकारी पुछना चाहता हूँ, ट्रिटमेंट प्लॉन्ट की रिक्वॉयरमेंट है क्या ?

श्री उराडे (कार्य.अभि.) :— मा. सभापती, यामध्ये महानगरपालिकेने शहरातील सांडपाण्याबाबतचा मास्टर प्लॉन तयार केला आहे. यात नमुद केलेली कामे दोन फेजेस मध्ये अनुक्रमे सन २०११ ते २०२६ आणि सन २०२६ ते २०४१ अशा प्रकारे राबवयाचा आहे. सद्या शहरात ३५० ते ४०० एम.एल.डी. अशुध्द पाण्याची निर्मीती होते. सन २०२६ पर्यंत ५०० ते ५५० एम.एल.डी. सांडपाण्याची निर्मिती होईल. सन २०२६ चे प्रदुषणाच्या लोडची काळजी घेण्याकरिता चार मलनिस्सा:रण केंद्र उभारण्याची आजच आवश्यकता आहे व म्हणून याची सुरुवात लवकरच करणे अत्यावश्यक आहे. मास्टर प्लान प्रमाणे सुध्दा या बांधकामांची सुरुवात होणे आवश्यक आहे. उत्तर सिवरेज झोन मध्ये १०० एम.एल.डी.ची दोन मलनिस्सा:रण केंद्रे, मध्य सिवरेज झोन मध्ये १ व दक्षिण सिवरेज झोन मध्ये १ असे एकूण चार मलनिस्सा:रण केंद्रांच्या कामास सुरुवात होणे आवश्यक आहे. पैकी महाजनको द्वारे १३० एम.एल.डी. क्षमता असलेल्या मलनिस्सारणाचे काम प्रगती पथावर आहे व उर्वरित कामे जेएनएनयुआरएम या प्रकल्पामध्ये प्रस्तावित केलेली आहे. सांडपाण्याचे संकलन व मलनिस्सारण केंद्र उभारण्याकरिता रु. १३२८.८८ कोटीचा खर्च अपेक्षीत आहे. या संबंधिचे विस्तृत प्रकल्प अहवाल केंद्र शासनाचे सीपीएचईओओ, नवी दिल्ली या संस्थेस तांत्रिक पडताळणीकरिता पाठविण्यात आले होते. या संबंधी त्यांनी डिझाईन क्रायटेरिया मध्ये बदल सूचविलेले आहेत. यामुळे प्रकल्पाचे किंमत कमी होण्यास मदत होईल. सद्यापरिस्थीत ७० ते ८० टक्केचे सांडपाणी ट्रिट होत आहे. उर्वरित सांडपाण्यामुळे नद्या दुषित होऊन अंतत: धरणातील पाणी दुषित होत आहे. आधी स्पष्ट केल्याप्रमाणे लोक सहभागातून एसटीपी बांधावे लागणार आहे.

श्री किशारे गजभिये :— ३/९/२०१२ ला बीड ओपन केले काय ? लोक सहभागातून काम करावे असे ठरले होते काय ?

श्री उराडे (कार्य.अभि.) :– मा. सभापती, ३/९/२०१२ ला बीड ओपन केले. मा. उच्च न्यायालयात शपथपत्र सादर केल्याप्रमाणे जेएनएनयुआरएम चे माध्यमातून शहरातील सांडपाण्याच्या प्रकल्पाला केंद्र शासन व महाराष्ट्र शासन अर्थसहाय्य प्राप्त होण्याकरिता प्रयत्न सुरु आहे. परंतू समांतर विषयाअंतर्गत सुचविल्याप्रमाणे पी.पी.पी. तत्वावर मलनिस्सारण केंद्र उभारणे ही सुध्दा काळाची गरज आहे.

सभापती :– हा इतका महत्वाचा विषय आहे. या विषयाच्या अनुषंगाने दि. २५/११/२०१०, दि. १२/०१/२०१२, दि. ११/०५/२०१२ या वेगवेगळया तारखेला मा. उच्च न्यायालयाने आदेश दिले. त्या आदेशाच्या अनुषंगाने दि. ३०/११/२०१०, दि. २१/०३/२०१२ महानगरपालिकेच्या वतीने शपथपत्र सादर केले आहे. त्यानंतर महाराष्ट्र अर्बन इंफ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कं. लि., या महाराष्ट्र शासनाच्या अंगीकृत असलेल्या एजन्सीद्वारे प्रस्तावाची छाननी करण्यात आलेली आहे. त्याची मंजूरी आल्यानंतर हा प्रस्ताव चार महिन्यानंतर स्थायी समितीकडे पाठविल्यानंतर निगम आयुक्तांचे पत्र येते की या विषयात तांत्रिक त्रुटी आहे. तांत्रिक त्रुटी असल्यामुळे विषय पर बोलाविण्यात येतो परंतू काय त्रुटी आहे याचा काही उलगडा होत नाही. तांत्रीक त्रुटी कोणती आहे याची माहिती प्रशासन सांगू शकत नाही, तसेच आयुक्तांना ज्या तांत्रीक त्रुटया अभिप्रेत होत्या त्या सुध्दा आयुक्तांच्या वतीने प्रशासन स्पष्ट होऊ शकले नाही. अश्या महत्वाच्या विषयासाठी आयुक्त स्थायी समितीच्या सभेत उपस्थित राहात नाही. हा प्रकार अनाकलनिय आहे. महानगरपालिकेची जनमानसातली प्रतिमा मलीण करणारी आहे. जनतेत संभ्रम निर्माण करणारा प्रश्न त्यामुळे उपस्थित झाला आहे. तरी प्रस्तावित विषयात जी तांत्रीक त्रुटी आहे असे आयुक्तांना वाटते. त्या त्रुटीची दुरुस्ती करुन हा प्रस्ताव पुढील बैठकीत स्थायी समिती समोर सादर करावा असे या स्थायी समितीचे स्पष्ट मत झाले आहे. अन्यथा याची संपूर्ण जबाबदारी न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास आयुक्तांची राहील, असे पण या स्थायी समितीने स्पष्ट केले आहे. या प्रकारची गंभीर दखल हि स्थायी समिती घेत आहे.

वरील चर्चेनंतर नागपूर शहरात निर्मित होणाऱ्या सांडपाण्यावर लोकसहभागाद्वारे भांडेवाडी येथील मलनि:सारण केन्द्राचे पुर्नवसन करुन २०० द.ल.लि. पर्यंत क्षमता वाढविणे.

प्रस्तावना :

नागपूर शहराचे एकूण क्षेत्रफळ २१७.५६ चौ.कि.मी. असून सध्याची लोकसंख्या अंदाजे २५.०० लक्ष आहे. मलनि:सारण योजना नागपूर शहराच्या प्राकृतिक पातळीवर (Topogaphy नुसार) तीन प्रमुख भागात विभाजित करण्यात आलेली आहे.

- नॉर्थ झोन : उत्तर–पश्चिम व पूर्व नागपूरचा भाग
- सेन्ट्रल झोन : नागपूरचा मध्य मिळून भाग
- साऊथ झोन : पश्चिम दक्षिण भाग

सांडपाणी निर्मिती व शुध्दीकरण :

**CPHEEO** च्या मापदंडानूसार **(Design Criteria for Water Supply)** प्रमाणे उत्तर, मध्य व दक्षिण सिवरेज झोन अंतर्गत भविष्यातील लोकसंख्येमध्ये होणारी वाढ

गृहीत धरुन खालील तक्त्याप्रमाणे झोननिहाय सांडपाण्याची निर्मिती होत आहे व भविष्यात होईल.

| Projected Year | North Sewerage Zone | Central Sewerage Zone | South Sewerage Zone | Total Sewage Generation in Nagpur City (MLD) |
|---|---|---|---|---|
| | Sewage (MLD) | Sewage (MLD) | Sewage (MLD) | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| **2011** | 117.44 | 142.55 | 85.40 | 345.39 |
| **2026** | 185.39 | 189.50 | 135.63 | 510.52 |

मध्य नागपूर हा दाट लोकवस्ती असलेला भाग असून त्याकरिता भुयारी गटार योजना अस्तित्वात आहे. या भागातून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याच्या शुध्दीकरणाकरिता भांडेवाडी येथे मलशुध्दीकरण केन्द्र बांधण्यात आले असून तेथे ७०–८० द.ल.लि. प्रतिदिन सांडपाण्याचे शुध्दीकरण होते.

वाढीव लोकसंख्ये प्रमाणे नागपूर शहरात दररोज अंदाजे ३५० ते ४०० Mld Waste Water (सांडपाणी) निर्मिती (Generate) होते. पावसाळया (Monsoon Season) मध्ये सांडपाण्याची वाढ होत असते. सद्यस्थितीत अंदाजे २७५ ते ३२५ एम.एल.डी सांडपाणी पिवळीनदी व नागनदीत सोडावे लागते.

उपरोक्त तीनही झोन मधील अंदाजे ७० % टक्के भाग हा सिवरेज नेटवर्क द्वारे व्यापलेला आहे. नागपूर शहरातील सिवर लाईनची लांबी अंदाजे १६७० कि.मी. इतकी असून व्यास १५० मी.मी. ते १८०० मी.मी. इतका आहे.

**<u>झोननिहाय प्रस्तावित मलनि:सारण केन्द्र :</u>**

| | उत्तर | मध्य | दक्षिण |
|---|---|---|---|
| २०११ ते २०२६ | २ | १ * | १ |

* १३० द.ल.लि. क्षमतेच्या मलनि:सारण केंद्राचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

**वित्तीय स्वरुप :**

उपरोक्त सर्व प्रकल्प केन्द्र शासनाचे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनर्रुत्थान अभियानांतर्गत शासकीय निधी मिळण्यास्त सादर करण्याचा मनपाचा मानस आहे. या प्रकल्पाकरीता लाणणाऱ्या खर्चाचा तपशील पुढील प्रमाणे राहील.

| Particulars | North Sewerage Zone | Central Sewerage Zone | South Sewerage Zone | Total |
|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** |
| Sewage Generated in 2011 | 117.44 Mld | 142.55 Mld | 85.40 Mld | 345.39 Mld |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Sewage Generated in 2026 | 185.39 Mld | 189.50 Mld | 135.63 Mld | 510.52 Mld |
| Estimated cost of STP | Rs. 188.78 Crs. | 0 | Rs. 78.66 Crs. | Rs. 267.44 Crs. |
| Estimated cost of Sewerage | Rs. 425.47 Crs. | Rs. 370.30 Crs. | Rs. 265.67 Crs. | Rs. 1061.44 Crs. |
| **Estimated cost of STP & Sewerage System** | **Rs. 614.25 Crs.** | **Rs. 370.30 Crs.** | **Rs. 344.33 Crs.** | **Rs. 1328.88 Crs.** |
| GOI (50%) | Rs.307.13 Crs. | Rs. 185.16 Crs. | Rs. 172.17 Crs. | Rs. 664.46 Crs. |
| GOM (20%) | Rs. 122.85 Crs. | Rs. 74.06 Crs. | Rs. 68.87 Crs. | Rs. 265.78 Crs. |
| NMC | Rs. 155.36 Crs. | Rs. 93.64 Crs. | Rs. 80.20 Crs. | Rs. 329.20 Crs. |
| NIT | Rs. 28.92 Crs. | Rs. 17.48 Crs. | Rs. 23.10 Crs. | Rs. 69.50 Crs. |

हा निधी प्राप्त झाल्याशिवाय स्वबळावर मनपास अशी कामे हाती घेणे अत्यंत कठीण आहे.

**लोकसहभाग व खाजगी भागीदारीतून मलनि:सारण केन्द्राचे बांधकाम करणे (PPP) :**

सध्या नागपूर शहरात ३५० ते ४०० Mld सांडपाण्याची निर्मिती होते यातील फक्त ७० Mld सांडपाण्यावर भांडेवाडी येथे प्रक्रिया करुन नाग नदीत सोडण्यात येते. मनपा व महाजेनको सोबत झालेल्या करारानुसार पुढील २ वर्षात १३० Mld सांडपाण्यावर प्रक्रिया पूर्ण होईल.

धार्मिक फांउडेशन द्वारा मा. उच्च न्यायालयात दाखिल जनयाचिकेच्या (PIL No 38/2010) निर्णयानूसार मनपाला Sewage treatment चा time bound schedule शपथपत्राद्वारे सादर करण्यास सांगण्यात आले. त्यानुसार मनपाने महाजेकोद्वारा सादर time schedule व PPP तत्वावर उर्वरीत सांडपाण्यावर आधारीत Sewage Treatment Plant करीता दिलेला time schedule शपथपत्राद्वारे मा. उच्च न्यायालयात सादर करण्यात आलेला आहे. याद्वारे मनपाला नाग नदीतील सांडपाण्याचे प्रदुषण कमी होण्यास मदत होईल. याकरीता सद्यस्थितीत भांडेवाडी येथील STP upgradation करुन त्याला २०० Mld क्षमतेपर्यंत करावयाची आहे. उपरोक्त कामास भरपूर निधीची आवश्यकता भासेल. करीता मनपाद्वारे PPP तत्वावर उपरोक्त मलनि:सारण केन्द्र बांधण्याचा मानस आहे.

PPP तत्वावर प्रकल्प राबविण्याकरीता खालीलप्रमाणे Annuity basis आर्थिक बिंदु गृहीत धरण्यात आलेले आहे.

1. The Operator shall treat the sewage to the secondary level so as to fulfill the surface water standards laid down by MPCB. (30/100), BOD-30 mg/L @$27^0$ for three days & suspended solid 100 mg/l through proven technology.
2. Out of total capital cost, 70% will be in the form of loan (RI=13%).
3. Remaining 30% of the cost shall be invested by the bidder. (RR=18%)
4. O&M of the secondary treatment plant shall be looked after for 30 years by the operator.

5. Out of secondary treated waste water 25 Mld shall be given to NMC without any cost.
6. Remaining 175 Mld treated waste water the operator will have right to sale to the potential users.
7. Annuity ranging from Rs. 30.00 Crs to Rs. 40.00 Crs.
8. Out of this, NMC should be in a position to earn Rs. 30.00 Crs. to 40.00 Crs. Per annum as royalty after the sale of treated waste water.
9. Ownership of land & the plant shall be of NMC.

महानगरपालिकेद्वारा प्रस्तावित PPP तत्वावर ची ढोबळ किंमत अंदाजे रु. १७०.५ कोटी इतकी आहे. आर्थिक बिंदु लक्षात घेता या प्रकल्पाची Net Present Value (NPV) रु. २९७.६० कोटी राहील.

प्रकल्पाची राशी फार जास्त असल्यामुळे महानगरपालिकेला स्वत:चे बजेट मधून इतकी मोठी राशी या प्रकल्पाकरीता वळती करणे शक्य नसल्यामुळे PPP तत्वावर STP बांधण्याकरीता महानगरपालिकेने Expression of Interest मागविले असता १९ कंपन्यांनी इच्छा दर्शविली. उत्तर व दक्षिण सिवरेज झोन चे सांडपाणी भांडेवाडी येथे आणून मलनि:सारण प्रक्रिया केन्द्र बांधण्याकरीता १९ कंपन्यांना RFP document देण्यात आले

१९ कंपन्यांपैकी RFP documents खालील ६ कंपन्यांनी सादर केली आहेत.

1. M/s. ESSAR-THEMAX-SREI, (JV), Mumbai
2. M/s. GHARPURE Engineers & Constructions Pvt. Ltd. – United Phosphorous Ltd., (JV) – Pune
3. M/s RAMKY Infrastructure, Hyderabad, India
4. M/s. SEW –AIPPL (JV), Hyderabad
5. M/s. Triveni, Engineering Industries Ltd.- Oriental Structural Engineers Pvt. Ltd. (JV), NOIDA, U.P.
6. M/s. Vishwaraj Infrastructure Ltd Nagpur – Drake & Scull Water & Power LLC – Vasundhara drills & drainage Pvt. Ltd. (JV), Nagpur

या सहाही कंपन्यांनी सादर केलेला आर्थिक निविदेचा तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Name of the Bidders | Price quoted | Remarks |
|---|---|---|---|
| 1 | M/s. ESSAR-THEMAX-SREI, (JV), Mumbai | 38954.11 lacs | 3rd Lowest |
| 2 | M/s. GHARPURE Engineers & Constructions Pvt. Ltd. – United Phosphorous Ltd., (JV) – Pune | 51174.00 Lacs | 5th Lowest |
| 3 | M/s RAMKY Infrastructure, Hyderabad, India | 31958.33 Lacs | 2nd Lowest |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | M/s. SEW –AIPPL (JV), Hyderabad | 61890.58 Lacs | 6th Lowest |
| 5 | M/s. Triveni, Engineering Industries Ltd.- Oriental Structural Engineers Pvt. Ltd. (JV), NOIDA, U.P. | 48916.00 Lacs | 4th Lowest |
| 6 | M/s. Vishwaraj Infrastructure Ltd Nagpur – Drake & Scull Water & Power LLC – Vasundhara drills & drainage Pvt. Ltd. (JV), Nagpur | 26171.59 Lacs | **1st Lowest** |

उपरोक्त निविदांची शहानिशा Maharashtra Urban Infrastructure Development Co. Ltd. (MUINFRA), State PPP expert यांचे मार्फत करण्यात आलेली आहे. या सर्वांनी सादर केलेले तांत्रिक व आर्थिक निविदेची पडताळणी केल्यावर M/s. Vishwaraj Infrastructure Ltd Nagpur – Drake & Scull Water & Power LLC – Vasundhara drills & drainage Pvt. Ltd. Nagpur (Joint Venture) यांची सर्वात निम्नतम राशीची निविदा रु २६१७१.५९ लक्ष इतकी आहे.

मनपाने हे काम जर M/s. Vishwaraj Infrastructure Ltd Nagpur – Drake & Scull Water & Power LLC यांच्या दरावर (रु. २६१.७१ कोटी) दिल्यास Cost-benefit comparative statement प्रमाणे मनपाला रॉयल्टी मधून ॲनुवीटी वगळल्यास ३२ वर्षानंतर एकूण रु. १११०६०.००—९४७६९.०० = १६२९१.००लक्ष (रु. १६२.९१ कोटी) निव्वळ फायदा होईल.

EOI मुळे मनपास पुढीलप्रमाणे फायदा अपेक्षित आहे.

**A.** PPP ऑपरेटरला जर हे काम दिले तर यामुळे वैनगंगा नदीवर असलेले गोसीखुर्द धरणाचे (राष्ट्रीय प्रकल्प) पाणी प्रदुषण विरहीत करण्यास मदत मिळेल. तसेच धार्मिक फाउंडेशन द्वारे दाखल जनहीत याचिकेत PIL No. 38/2010 अंतर्गत मा. उच्च न्यायालय द्वारे दिलेल्या निर्देशांचे पालन करणे शक्य होईल. तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांचे सुध्दा पालन करणे शक्य होईल.

**B.** PPP ऑपरेटर यांनी सादर केलेल्या आर्थिक निविदेप्रमाणे वार्षिक राशी (Annuity basis) प्रमाणे देण्यात येईल व यामुळे मनपावर एकाच वेळेस आर्थिक बोझा पडणार नाही. मात्र पुर्नचक्रीकरण केलेल्या सांडपाण्याची विक्रि झाल्यास मनपाला हा प्रकल्प विनामुल्य होईल.

**C.** प्रक्रिया केलेले पाणी विकून मनपास अंदाजे रु. ३२.०० कोटी प्रति वर्ष रॉयल्टीच्या स्वरुपात प्राप्त होईल. महानगरपालिकेला ३२ वर्षात रु. १६२.९१ कोटी निव्वळ राशी प्राप्त होईल.

**D.** २५ Mld (treated) प्रक्रिया केलेले पाणी मनपास free of cost मिळेल.

१. PPP तत्वावर प्रकल्प राबविण्याकरीता जे आर्थिक बिंदु गृहीत धरलेले आहेत त्यांचा स्विकार करणे.

२. M/s. Vishwaraj Infrastructure Ltd Nagpur – Drake & Scull Water & Power LLC – Vasundhara drills & drainage Pvt. Ltd. (Joint Venture), Nagpur यांनी मनपाने ठरविलेल्या आर्थिक बिंदुवर आधारित सादर केलेली NPV रु. २६१.७२ कोटी ची निन्मतम निविदेस व त्याचे प्रक्रियेस मंजूरी प्रदान करणे.

३. PPP प्राजेक्ट चे काम पूर्ण झाल्यावर मनपाने ३० वर्षा पर्यंत रकमेची परतफेड करणे.

४. मनपास उपरोक्त प्रमाणे (ABCD) लाभ होईल त्याचा स्विकार करणे.

५. सिवरेज एस्क्रो अकाउंटची निर्मिती करुन ॲन्युटीची परतफेड करणे. यामध्ये महाजेनकोद्वारे मनपास भविष्यात प्राप्त होणाऱ्या रु. १५.०० कोटी प्रति वर्ष याचा समावेश राहील.

सबब, उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने व प्रशासनाने सुचित केल्यानुसार आयुक्तांचे विनंती पत्र क्र. एम.सी./२४६/२०१३ दिनांक १२.०७.२०१३ अन्वये प्रस्तावित विषय तांत्रीक दुरुस्ती करण्याकरिता कार्यालयाने परत मागितला असल्यामुळे विषयातील काही तांत्रीक चुकांच्या दुरुस्तीसह हा विषय स्थायी समिती समोर जूलै महिण्याच्या येणाऱ्या लगतल्या सभेत निर्णयार्थ ठेवण्यांत यावा या सुचनेसह हा विषय कार्यालयास आयुक्तांच्या विनंती प्रमाणे परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 88</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर